**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती; मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, कोल्हापूरला रेड अलर्ट; नुकसान झालेल्या भागांचे पंचनामे करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

- जालना जिल्ह्यात अपघातात तीन जणांचा तर अहिल्यानगरमधे दुकानाला आग लागून पाच जणांचा मृत्यू

- रालोआकडून उपराष्ट्रपतीपदासाठी उमेदवार म्हणून घोषणा झाल्यानंतर राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन दिल्लीला रवाना, इंडिया आघाडी आज उमेदवार ठरवणार

**आणि**

- भालाफेकपटू नीरज चोप्रा याचा डायमंड लीगमध्ये प्रवेश निश्चित

**<><><><><>**

राज्यात अनेक ठिकाणी आज मुसळधार पाऊस सुरू आहे. अनेक नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली असून धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरु आहे. सतत होत असलेल्या मुसळधार पावसामुळे राज्यात पूरसदृश स्थिती निर्माण झाली आहे. हवामान विभागानं मुंबई, ठाणे, रायगड आणि पुणे घाट, सातारा घाट, रत्नागिरी, कोल्हापूर घाट या भागांना रेड अलर्ट तर, पालघर, सिंधुदुर्ग, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, अमरावती, चंद्रपूर आणि गडचिरोली या भागात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तसंच समुद्राची स्थिती खवळलेली असून ताशी ५०-६० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता असल्याने मच्छिमारांना समुद्रात न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**मुंबई** आणि उपनगरात आज सकाळपासून जोरदार पाऊस सुरु आहे. आज सकाळी साडे ८ ते साडे ११ या तीन तासाच्या कालावधीत सांताक्रूझ वेधशाळेत

सुमारे ४७ मिलिमीटर तर कुलाब्यात २९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. शहर आणि उपनगराच्या सखल भागात पाणी साचलं असून वाहतूक मंदावली आहे. मुंबईत अंधेरी सबवेवर पाणी साचलं असून इथली वाहतूक बंद करण्यात आली आहे. पश्चिम आणि हार्बर रेल्वे दहा ते पंधरा मिनिटे उशिराने धावत आहेत. मध्य रेल्वेच्या रुळांवर पाणी साचलं आहे. त्यामुळे मुंबईतील सर्व शाळा, महाविद्यालयांना आज दुपारच्या सत्रात सुटी जाहीर करण्यात आली आहे. मुंबई उपनगरचे पालकमंत्री आशिष शेलार यांची मुंबई महानगरपालिका मुख्यालयातल्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाला भेट देऊन पावसाच्या स्थितीचा आढावा घेतला.

**नवी मुंबई** आणि परिसरात सकाळपासून पावसाची संततधार सुरू आहे. सकाळी साडेआठ ते दुपारी साडेबारा या चार तासांत सुमारे ३६ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.

**रत्नागिरी**-कोल्हापूर महामार्गावर संगमेश्वर तालुक्यात  आंबा घाटात दरड कोसळल्यामुळे वाहतूक ठप्प झाली होती, दुपारी तीन वाजता वाहतूक सुरू झाली. दरड बाजूला हटवण्याचं काम युद्धपातळीवर सुरू असून एकेरी वाहतूक सुरु झाली आहे. खेडमधल्या जगबुडी नदीने आज सकाळी धोक्याची पातळी ओलांडली आहे. संगमेश्वरातली शास्त्री आणि राजापुरातली कोदवली या नद्यांनी इशारा पातळी ओलांडली आहे. संगमेश्वरमधील वीजपुरवठा अद्याप ठप्पच आहे. नारिंगी नदीचे पाणी रस्त्यावर आल्याने खेड-दापोली मार्ग बंद झाला आहे.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात गेल्या २४ तासांत जिल्ह्यात ८६ मिलिमीटर पाऊस पडला. कणकवली तालुक्यात सर्वाधिक १७२ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. सखल भागातल्या पुलांवर पाणी आल्याने काही ठिकाणी वाहतूक ठप्प झाली आहे. पडझडीच्या घटना सुद्धा घडल्या आहेत.

**कोल्हापूर** जिल्ह्यातल्या वारणा धरणामधून ५ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे.  कुंभी धरणातून एकूण तेराशे क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरु आहे. दूधगंगा

धरणामधून एकूण ५ हजार ५०० क्युसेक विसर्ग नदीपात्रमध्ये सुरु आहे. त्यामुळे नदीकाठच्या लोकांना सतर्कतेचा इशारा प्रशासनानं दिला आहे.

**नांदेड** जिल्ह्यात मुखेड तालुक्यात अतिवृष्टीमुळे लेंडी धरणाच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. रावनगाव इथं पुराच्या पाण्यात अडककेल्या २२५ नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आलं आहे. ५ नागरिक बेपत्ता असून, त्यांचा शोध घेतला जात आहे. हसनाळ इथं ८, भासवाडी इथं २० तर भिंगेली इथं ४० नागरिक अडकले आहेत. एनडीआरएफच्या पथकामार्फत बचाव कार्य सुरु आहे. **सातारा** जिल्ह्यात कोयना धरणाचे दरवाजे उघडले असून एकूण २१ हजार ३०० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरु आहे. **हिंगोली** जिल्ह्यातही पावसाचा जोर वाढला असून ईसापूर आणि सिद्धेश्वर धरणातून पाण्याचा विसर्ग सुरु आहे. **जालना** शरासह जिल्ह्यात रात्रभरापासून पाऊस सुरु आहे.**परभणी** जिल्ह्यातल्या निम्न दूधना धरणाचे दरवाजे उघडण्यात आले असून त्याद्वारे एकूण २ हजार ६३८ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

**<><><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज राज्यातल्या पावसाचा आढावा घेतला. तसंच अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागांचे पंचनामे करण्याचे आदेश दिले. मुंबईत आज सकाळी ६ ते ८ या कालावधीत १७० मिलिमिटर पावसाची नोंद झाली असल्याचं त्यांनी सांगितलं. कोकण विभागाचं सर्वात जास्त पाऊस झाल्याचं ते म्हणाले. १५-१६ जिल्ह्यांना पावसाचा रेड तसंच ऑरेंज अलर्ट असल्याचं त्यांनी सांगितलं. मराठवाड्यातल्या ८०० गावांना अतिवृष्टीचा फटका बसला असून १ लाख हेक्टर शेतीचं नुकसान झालं असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यात नेवासा इथं एका फर्निचर दुकानाला लागलेल्या आगीत एका कुटुंबातल्या पाच जणांचा मृत्यू झाला. तर एक जण जखमी झाला

आहे. नाशिक जिल्ह्यातल्या चांदवड इथंही आज एका खासगी बसला आग लागली. यातून ३९ प्रवासी प्रवास करत होते. यातल्या काही जणांना किरकोळ जखम झाली आहे. मात्र अनेक प्रवाशांचे सामान जळून खाक झाले.

**<><><><><>**

जालना जिल्ह्यात जालना राजूर मार्गावर काल संध्याकाळी ट्रक आणि रिक्षाची धडक होऊन झालेल्या अपघातात तीनजण ठार झाले. या प्रकरणी ट्रक चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार म्हणून महाराष्ट्राचे विद्यमान राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचं नाव घोषित करण्यात आलं आहे. राधाकृष्णन हे अनुभव समृद्ध असून, विविध पदांवर काम करताना त्यांनी समाजाची सेवा आणि उपेक्षितांना सक्षम बनवण्यावर भर दिल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमांवर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनीही राधाकृष्णन यांच्या उमेदवारीचं स्वागत केलं आहे. तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी राज्यपालांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचं अभिनंदन केलं आहे. उमेदवारीची घोषणा झाल्यानंतर राज्यपाल राधाकृष्णन आज दिल्लीला रवाना झाले. पुढील महिन्याच्या ९ तारखेला उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक होणार आहे.

**<><><><><>**

इंडिया आघाडी उपराष्ट्रपतीपदासाठी उमेदवाराची घोषणा आज करणार असल्याचं काँग्रेस महासचिव के सी वेणुगोपाल यांनी सांगितलं. आघाडीतल्या सर्व पक्षांशी चर्चा सुरू असून सहमतीनं उमेदवार ठरवला जाईल असं ते म्हणाले.

**<><><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात आज लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं. लोकसभेतही कामकाजाला सुरुवात होताच विरोधकांनी मतदार याद्या पुनरीक्षणावर चर्चेची मागणी करत घोषणाबाजी केली. दरम्यान, विरोधी पक्षांच्या सदस्यांनी हौद्यात उतरत घोषणाबाजी सुरू केली. या सदस्यांनी सरकारी मालमत्तेचं नुकसान केलं, तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असा इशारा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी दिला. मात्र, त्यानंतरही गदारोळ सुरूच राहिल्यानं सभागृहाचं कामकाज दुपारी बारा वाजेपर्यंत नंतर दोन आणि त्यानंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात आजही विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून सभागृहांमध्ये जोरदार घोषणाबाजी केली. विविध राजकीय पक्षांकडून १९ स्थगन प्रस्ताव मिळाले असून त्यातले काही बिहारच्या मतदार याद्या पुनरीक्षणाबाबतच्या असल्याची माहिती हरिवंश यांनी दिली. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचं सांगून या सर्व सूचना त्यांनी फेटाळल्या.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगाने लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना त्यांच्या मतचोरीविषयीच्या वक्तव्याबद्दल सात दिवसांच्या आत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रतिज्ञापत्रासोबत गांधी यांनी पुरावे जोडावेत अन्यथा जाहीर माफी मागावी, असे निर्देशही आयोगाने गांधी यांना दिले आहेत. प्रतिज्ञापत्र सादर न केल्यास गांधी यांचे आरोप खोटे होते, असं मानण्यात येईल, असंही आयोगाने स्पष्ट केलं आहे. भाजप नेत्यांनी आयोगाच्या या कारवाईचं स्वागत केलं असून इंडिया आघाडीने निवडणूक आयोगाचा वापर राजकीय शस्त्र म्हणून केल्याचा आरोप केला आहे.

**<><><><><>**

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली निघालेली मतदार अधिकार यात्रा आज दुसऱ्या दिवशी बिहारच्या औरंगाबाद जिल्ह्यातल्या देव इथं पोहोचली.

औरंगाबाद इथल्या सूर्य मंदिरात जाऊन गांधी यांनी दर्शन घेतलं. बिहारमधील मतदार यादीत केल्या जाणाऱ्या विशेष पुनरिक्षण प्रक्रियेला विरोध करण्यासाठी मतदार अधिकार यात्रा काढली आहे. १६ दिवस चालणाऱ्या या यात्रेत इंडिया आघाडीतील विविध पक्षांचे नेते सहभागी होणार आहेत. ही यात्रा २० हून अधिक जिल्ह्यांत जाणार असून १ सप्टेंबर रोजी पटना इथल्या गांधी मैदानात समारोप सभा होईल.

**<><><><>**

विद्यमान विश्वविजेता आणि दोनवेळा ऑलिम्पिक पदक पटकावणारा भालाफेकपटू नीरज चोप्रा यानं डायमंड लीगच्या अंतिम फेरीतलं स्थान निश्चित केलं आहे. २७ आणि २८ ऑगस्ट रोजी स्वित्झर्लंडमध्ये ही स्पर्धा होईल. नुकत्याच झालेल्या सिलेसिया लीगमध्ये त्यानं भाग घेतला नसला, तरी या हंगामातली त्याची कामगिरी उत्तम असल्यामुळे तो डायमंड लीगसाठी पात्र ठरला. अँडरसन पीटर्स आणि लुईज मॉरिशिओ दा सिल्वा यांच्यासारखे त्याचे प्रतिस्पर्धीही या स्पर्धेसाठी पात्र ठरण्याच्या मार्गावर आहेत. नीरज चोप्रा यानं २०२२ मध्ये डायमंड लीगचं जेतेपद पटकावलं होतं, तर २०२३ आणि २०२४ मध्ये त्याला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं होतं.

**<><><><>**

महावितरणमध्ये विद्युत सहायक पदासाठी निवड झालेल्या ५ हजार ३८१ उमेदवारांची आणि संबंधित परिमंडळांची यादी कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे.

**//<><><><><>//**